RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# स्त्रीयांचे सक्षमीकरण आणि मानवाधिकार

**प्रा.डॉ. हरीदास लाडके**
स्व.राजेंद्रसिंह उर्फ बाबा
व्यास कला वाणिज्य
महाविद्यालय कोंढाळी

---

**प्रस्तावना —**

जागतिक मानवी हक्क जागृती दिन १० डिसेंबर १९४८ ला पाळला जातो. दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर ज्यांनी तिसऱ्या महायुध्दाची कल्पना करूण पाहीली व त्यामधुन भयावह असे चित्र दिसले त्याला प्रतिबंध लावण्याच्या दृष्टीने जागतिक स्तरावर युनोच्या माध्यमातून जे प्रयत्न झाले ते अखिल मानव विश्वाला अबाधित ठेवण्यास उपयुक्त ठरणारे आहे मानवी जिवनमुल्ये नेमकी कोणती आहे ते ओळखुन सर्वांना परस्पर सहिष्णुता, सहकार्य, विश्वास वाढविण्यासाठी अनेक मार्गांनी आव्हान करून मानवी हक्काचा जहीरनामा ठरविण्यात आला व त्यात काही सुधारणा करून १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांची सनद युनोने मान्य करून सर्व मानसे जन्मत: व निसर्गत: सामान्य आहे व स्वातंत्र्य आहे. जन्म, वंश, लिंग, संपत्ती या आधारे कोणताही भेदभाव होणार नाही. स्त्रीयांना पुरूषांप्रमाणे समान हक्क राहतील. बाल हक्कांनाही महत्व देण्यात आले. तसेच भूतलावर जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीचा मानवाधिकाराच्या संदर्भात विचार करण्यात येवु लागला.

**मानवाधिकार म्हणजे काय?**

मानव म्हणून जगण्यासाठी आवश्यक मानवांच्या नैसर्गीक अस्तीत्वाशी संबंधीत अशा सर्व अधिकारांना मानवाधिकार म्हणतात. प्रत्येकाला आपले व्यक्तिमत्व विकसीत करण्यासाठी आपले व्यक्तित्व गुण, बुध्दिमत्त व स्वत्व भावनेची जपणूक करण्यासाठी तसेच आपल्या आत्मीक व इतर जिवनाष्यक गरजा व निकडी पुर्ण करण्यासाठी मानवाधिकाराची आवश्यकता असते.

संयुक्त राष्ट्र संघाने मानवाच्या मुलभूत अधिकारांमध्ये मानवाच्या प्रतिष्ठा व मुलतत्वामध्ये आणि सर्व महीला, पुरूष व बालके, लहाण मोठे सर्वांसाठीच्या समान अधिकाराच्या तत्वांमध्ये निष्ठा व्यक्त केली. मानवाधिकारांची अम्मलबजावणी करणाऱ्या जगातील ज्या निरनिराळया प्रतिनिधिक संघटना आहे त्यांच्या आचारसंहीता मध्ये सर्व मानव प्राण्यांच्या जिवनांशी संबंधीत सर्व प्रकारच्या मानवाधिकारांचा समावेश प्रामुख्याने करण्यात आला.

**जागतिक पातळीवरून मानवी हक्क अंतर्गत महीला विकासाचे प्रयत्न —**

१९७५ ला राष्ट्रसंघाने स्त्री दशक जाहीर करून जगभर जनजागरण कार्यक्रम व उपक्रम हाती घेतले. १९८५ मध्ये नैरोबी येथे आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रथमच महीलाश्रमाची नोंद घेतली. १९८८ मध्ये जागतिक महीला सबलीकरण परिषद झाली त्यात सबलीकरण विकासाला हातभार लावते हे मान्य करण्यात आले. १९९३ मध्ये

व्हिएन्ना येथे मानवी हक्का संबंधी झालेल्या परिषदेमध्ये स्त्री पुरूषांना समान मानवी हक्क भोगण्यासंबंधी अधिकार सर्वसंमत करून एक जाहीरनामा प्रस्तुत करण्यात आला. त्यातील मानवी हक्कांचे विविध पैलु असे आहेत —

- शिक्षण आणि आरोग्यसह सर्वच मुलभूत सेवांचा लाभ घेण्याची समान संधी.
- राजकीय आणि आर्थिक प्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधी.
- लिंग भेदामुळे आणि अत्याचारातुन स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाचे निर्मुलन.
- समान कामासाठी समान वेतन.
- जिवनाच्या सर्व क्षेत्रात कामाच्या सार्वजनिक ठिकाणी समान नागरीकत्वाचे हक्क.

स्त्रियांच्या संदर्भात जागतिक स्तरावरून मानवाधिकाराच्या बबतीत वरील पैलु मान्य करण्यात आले.

सुयुक्त संघाच्या विधिनियमाच्या प्रस्तावणेमध्ये मुलभुत मानवाधिकारांना मानव जिवणाची प्रतिष्ठा व मुल्ये आणि स्त्री—पुरूष समानता या हक्कांना मान्यता दिलेली आहे. जागतिक लोकांच्या आर्थिक व सामाजिक सुधारणेसाठी आंतरराष्ट्रीय यंत्रणा राबविण्यासाठी त्याचप्रमाणे महीलांच्या हक्का मधिल सुधारणेसाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या विधिनियमामध्ये आणि अन्य मानवाधिकारांच्या आचारसंहीता मध्ये महीलांचे हक्क व तरतुदिंचा समावेश केलेला आहे.

**भारतातील असंघटीत क्षेत्रातील महीली उत्थानाचे कार्य —**

भारतात स्वातंत्रपुर्व काळात स्त्रीयांचा दर्जा घसरू लागला. मुस्लीम आक्रमनानंतर स्त्रीयांची स्थिती खुपच खालावली. परंपरागत रूढी, परंपरामुळे स्त्रीयांचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दर्जा खुपच खालावला व स्त्रीयांना याच काळात चुल आणि मुल या चौकटीत बंदिस्त करण्यात आले. याच शतकात स्त्री सुधारणा चळवळीचा उदय होवुन स्त्री शिक्षणावर भर दिला. १९२७ मध्ये अखिल भारतीय महीला परीषद झाली. ४ डिसेंबर १९२९ ला लॉर्ड बेटींग यांनी बंदी कायदा करून स्त्री सुधारणेचे मोठे पाऊल टाकले. राजा राम मोहण राय, ईश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती यासारख्या समाजसुधारकांनी स्त्री सुधारणांचा पुरस्कार केला. छत्रपती शाहु महाराजांनी महीला विकासासाठी भरीव कार्य केले. त्यांनी २१ सप्टेंबर १९१७ रोजी प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागु केला. त्याच बरोबर स्त्री शिक्षणाचे अनेक निर्णय घेतले विधवा पुर्नविवाह कायदा, आंतर जतिय विवाह कायदा, विवाहाची मर्यादा वाढविली, घटस्फोट कायदा, स्त्री हींसा विरोधी कायदा असे अनेक कायदे करून महीला विकासाला हातभार लावला परंतु या प्रत्येकांना अपेक्षीत यश मिळाले नव्हते.

**स्वातंत्र भारतातील स्त्री दर्जा —**

भारत स्वांतत्र्य झाल्यावर भारत सरकारणे महीला विकासासाठी ठोस पावले उचलली आहेत. भारत सरकारणे महीलांना पुरूषांच्या बरोबरीने समान संधी देण्याचे अभिवचन राज्य घटनेत दिले आहे. २६ जानेवारी १९५० ला भारताची राज्यघटना

अमलात आली. या राज्यघटनेनंतर भारतीय समाजातील प्रत्येक नागरीकास मग पुरूष असो अथवा स्त्री सर्वांना समान अधिकार दिलेले आहे. सासाठी राज्यघटनेत महीलांसाठी विविध कलमे निर्माण केलेली आहे. समानतेचे तत्व अमलात आल्यानंतरसुध्दा महीलांना राजकारणाची राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची तसेच राजकारणांशी जवळीक निर्माण होण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानाच्या ७३ व्या संविधान दुरूस्तीने महीलांना स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये ३३ टक्के आरक्षण लागु करण्यात आलेले आहे. शासणाने नव्या महीला विषयक धोरणामध्ये पतीच्या सपत्तीत अधिकार, घराच्या रजिस्टरीमध्ये पत्नीचे नाव इत्यादी प्रकारच्या समान संधी उपलब्ध करून दिलेल्या आहे.

**घरघुती हिंसा अधिनियम २००५ व मानवाधिकार —**

महीलांना दिलासा देणारा कौटुंबीक हिसांचार २००५ या नव्या कायदयाची अंमलबजावणी २६ आक्टोबर २००६ पासुन सुरू झाली. या कायदयाअंतर्गत महीलांना शारिरीक, भावणीक, आर्थिक हुंडयाची गैरकायदेशिर मागणी, लैंगीक छळापासून संरक्षण मिळणारा आहे. या कायदयाअनुसार न्यायपिठा सामोर न्याय आल्यानंतर तिन दिवसाच्या आत त्याची सुनावणी घेण्याचे बंधन न्यायधिशांवर राहील. दावा दाखल झाल्यानंतर दोन दिवसाच्या आत तो निकाली काढण्याचे बंधन न्यायधिषावर टाकन्यात आले आहे. गुन्हयानुसार आरोपींना एक वर्ष सश्रम करावास, २० हजार रू दंड ठोठावला जाणार आहे. हा गुन्हा अजामिण पात्र ठरविण्यात आला आहे. या कायदयातील विशेष म्हणजे, 'लिव इन रिलेशनशिप' लग्नाशिवाय एकत्र राहणाऱ्या स्त्रीलाही तिच्या पुरूष सहकाऱ्याकडुन होणाऱ्या हिंसाचारापासून संरक्षण मिळणार आहे. घरात स्त्रीचा हीस्सा असो वा नसो त्या त्या घरात राहण्याचा तिचा आणि मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी उचलने त्या महीलेच्या नवऱ्याला बंधनकारक राहणार आहे. असहाय्यक, विवाहीत व अविवाहीत बहीनीला भाऊ घराबाहेर काढु शकणार नाही. महीलांच्या सबलीकरणासाठी हा कायदा एक महत्वाचा टप्पा मानला जात आहे.

**सारांश —**

वरील महीला विकासाविषयी तरतुदी पाहता जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवरून महीला उत्थानाचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक इ. दृष्टीने भरपूर उपाययोजना आणि कायदे केलेले आहे. परंतु त्या तरतुदीनुसार महीलांना मुक्तपणे अधिकार उपभोगता येतात असे दिसत नाही. भारतीय संविधानात समानतेचे तत्वलागु करण्यात आलेले आहे. परंतु राजकीय क्षेत्राचा विचार करता संसद विधी मंडळामध्ये सर्व सामान्य वर्गातील स्त्रीयांना संधी मिळत नाही ज्यांना राजकीय वारसा लाभलेला आहे. अशाच घरान्यातील स्त्रीया राजकीय दृष्टया पुढारलेल्या दिसतात. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महीलांच्या ३३ टक्के आरक्षणाची तरतुद केलेली आहे. त्या नुसार स्थानिक शासनामध्ये महीलांची संख्या वाढली परंतु निर्णय क्षमता वाढलेली दिसत नाही. शासणाने गर्भजल परिक्षण विरोधी कायदा करूनही गर्भजल परिक्षण करून

आईच्या गर्भातच मुलींची हत्या केली जाते. दिवसेंदिवस स्त्रीयांवरील अत्याचारांच्या प्रमाणात वाढ होत आहे. या सर्व तरतुदी आणि त्यांच्या विरूध्द घडणाऱ्या घटना मानव जातीला काळीमा फासणाऱ्या असून मानवाधिकाराचे हनन करणाऱ्या आहे. मानवाधिकाराची कडक अम्मलबजावणी व्हावी आणि सर्वांना सारख्या प्रमाणात अधिकार उपभोगता यावेत हीच अपेक्षा.

**संदर्भ सुची —**


- ब्रजकीशोर शर्मा — 'मानवाधिकारो की सार्वभौम घोषना' , प्रकाशन भारत सरकार, नई दिल्ली
- डॉ. स्मीता मेहेत्रे — 'भारतीय स्त्री आणि मानवाधिकार', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
- अभया शेलकर — 'मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३', नाशिक लॉ हाऊस प्रकाशन, औरंगाबाद
- डॉ. शेख हाशम, डॉ. गवई — 'राजकीय सिध्दांत', विश्व पब्लीशर्स अ‍ॅन्ड डिस्ट्रीब्युटर, नागपूर
- डॉ. शेख हाशम, डॉ. गवई — 'भारतीय शासन आणि राजकारण', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
- श्री रा.ज. लोटे — 'तुलनात्मक शासन आणि राजकारण', पिंपळापूरे ऍन्ड कंपनी पब्लीकेशन, नागपूर
- एच. ओ. अग्रवाल — 'मानवाधिकार', द्वितीय संस्करण, सेंट्रल लॉ पब्लीकेशन, इलाहाबाद
- डॉ. भारतीय लव्हेर — 'राजकारण ३३ टक्यांचे', छांद मानिकचंद नंदादिप पेपर प्रॉडक्ट प्रा.ली. पूणे
- नरेंद्र लांजेवार — 'राज्य व्यवस्थेत महीलांचा सहभाग', दैनिक नवराष्ट्र
- पाटील, पाटील — 'स्त्रीयांचा सत्येतील सहभाग', साप्ताहीक साधना, पूणे
- कमलाबाई देशपांडे — 'स्त्रीयांच्या कायदयाची वाटचाल', मनोहर ग्रंथालय प्रकाशन, पूणे.